महाराष्ट्र शासन

शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१


दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. क्र.dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com


---

जा.क्र.शिउसं/उमाशि ४/ MAHADBT/पुवि/२०१८-१९/८८४८ दि. / १० /२०१८.

24 OCT 2018

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य

सर्व उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालये,

अहमदनगर / पुणे / सोलापूर.

**विषयः- MAHADBT या ऑनलाईन शिष्यवृत्त्यांचे पोर्टल बाबत.**

**सदर्भ :-१.** मा.नेहा हुमरकर, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. डिबीटी-२०१७/ प्र.क्र. २२/ एसडी-५/दि. २३ जुलै २०१८ चे तातडीचे पत्र.

२. मा.शिक्षण संचालक, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. शिष्य/१८-१९/ डीबीटी/योजना/२२४/७४८५/ दि.२१.०८.२०१८.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, विद्यार्थ्यांच्या सर्व शिष्यवृत्त्यांचे आवेदनपत्रे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून **MAHADBT** या ऑनलाईन पोर्टलव्दारे स्विकृत करण्यात येणार आहे.

या पत्रान्वये आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीस पात्र ठरणा-या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे **www.mahadbtmahait.gov.in** या शासकीय स्कॉलरशिपच्या अधिकृत वेबसाईटवर आवश्यक ते कागदपत्रे अपलोड करुन ऑनलाईन अर्ज / आवेदनपत्रे दिलेल्या वेबसाईटवरील विहित तारखेपर्यंत भरण्यात यावेत, जर विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयाकडून भरण्यात आले नाहीत तर विद्यार्थ्यांचे होणा-या शैक्षणिक स्कॉलरशिप नुकसानीच्या रकमेसाठी महाविद्यालय प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील, तसे झाल्यास भविष्यात महाविद्यालयास विद्यार्थ्यांना रक्कम अदा करावी लागेल.

कमविचा नवीन लॉगिन आयडी व पासवर्ड टाकणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी, एकदा अकाऊंट उघडल्यानंतर कृपया नवीन पासवर्ड आपल्या स्तरावर बदलून घ्यावा.

**LOGIN ID= SE(UDISE NO)_Clerk Passwrd= Pass@123**

**LOGIN ID= SE(UDISE NO)_Principal Passwrd= Pass@123**

विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरतांना जर काही तांत्रिक अडचणी आल्या तर आपण कृपया वेबसाईटवर दिलेल्या मार्गदर्शनार्थ व्हिडिओ क्लिप पाहून आपल्या अडचणी दूर करुन, आवश्यकता भासल्यास दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून आपले सदरील कामकाज सुरळीतरित्या करण्याची आपली जबाबदारी राहील.

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग, पुणे

**प्रतः-** १.मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा. पुणे माहितीस्तव.

२.शिक्षणाधिकारी,(माध्यमिक/प्राथमिक/निरंतर), जिल्हा परिषदा, पुणे विभाग, पुणे/ अहमदनगर / सोलापूर / पुणे , गटशिक्षणाधिकारी, पंचायत समित्या, पुणे विभाग, पुणे , शिक्षण मंडळ प्राथमिक / माध्यमिक, सर्व मनपा व नगर पालिका शिक्षण मंडळ, पुणे विभाग, पुणे यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी